भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/११/२०१६

**१) संगनमत करून फोटो स्टुडीओचा ताला तोडुन सामानाची व नगदी पैशाची चोरी. :—**

दिनांक २४/११/२०१६ रोजी ००.३०. वा. दर. यातील दोन्ही आरोपींनी संगनमत करून १ पाढऱ्या रंगाची बोलेरो छोटा डाला क्र.एमएच ३६ एफ ३३७२ ज्यावर योगेश निर्वाण बोरगाव/राजे असे लिहलेल्या वाहणाचा चालक व मालक व इतर २ ते ३ इसमांनी मिळुन फिर्यादींचे श्रृती फोटो स्टुडीओचा ताला तोडुन व शटर्स उघडुन दुकानात आत प्रवेश करून दुकानातील १ संगनक असेंबल गेलेला एलजी कंपनीचा कि. ४०,०००/—रू, १ एक्सन कंपनीचा रंगित प्रिंटर कि. १५,००/—रू १ कॅनॉन कंपनीचा स्कॅनर कि. ६,०००/—रू १ निकॉन कंपनीचा कॅमेरा कि.३०,०००/—रू १ लॅमिनेशन मशीन कि.४०००/—रू संगनक हार्डडिक्स ज्यावर डब्लु.डी.असे इंजित लिहलेला कि. ५,०००/रू १ इनव्हटर व बॅटरी कि.२३,०००/—रू , १ काचेचा ग्लास फ्रेम कि. ५,०००/—रू ,बिडींग फ्रेम कि.२५,०००/—रू, फॉयबर फ्रेम कि. १०,०००/—रू, १ फ्रेम स्टापरल मशीन ४०००/—रू ,१ लाखडी स्टॅड बोर्ड कि.१,०००/—रू ,२ लाकडी प्लेट कि.१२,००/—रू, १ पाणी जार कि.६००/—रू नॉमिनेशन फोटो कि. २,०००/—रू ४ नग प्लास्टीक स्टुल कि. २००/—रू.,५ फोटो पेपेर पॅकेट कि. २५००/—रू.,१ इंक कार्टज २ पॅकेट कि. १४,००/—रू. संगनक ग्लॉस कि.४००/—रू ,१ युपीएस मॅक्रोटेक कंपनीचा कि. २०००/—रू व नगदी २०००/—रू असा एकुन १,८०,३००/—रू चा माल चोरून नेल्याने फिर्यादी वेतन रमेश गिऱ्हेपुंजे वय ३० वर्ष रा.वार्ड क्र.०१ लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४७५,३८०,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कुंभरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) बिना परवाना १ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २४/११/२०१६ रोजी ०६.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर मध्ये मालकाचे सागंनेवरून बिना रॉयल्टी अंदाजे १ ब्रास रेती कि. २,०००/—रू ची अवैध रित्या चोरून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी खंडाते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,१०९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) संगमत करून बिना परवाना रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १०/११/२०१६ रोजी १५.३५ वा. दर. यातील फिर्यादी सुखदेव खुशालराव वासनिक वय ५४ वर्ष रा. तहसील कार्यालय पवनी यांनी मा. अप्पर जिल्हाधीकरी सह घटना स्थळी भेट दिली असता १ पिवळया रंगाची जेसीपी व हुडाई कंपनीची पोकल्यॅड मशीन मिळुन आले व यातील आरोपी चालकांनी व मालकानी संगमत करून आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये प्रत्येकी ६ ब्रास रेती एकुन १२ ब्रास रेती कि. २४,०००/—रू ची चालकाने बिना परवाना अवैद्यरित्या ट्रक मध्ये भरून चोरून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पटले पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) विवाहीतेचा शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद. : —**

दिनांक १०/०३/२०१५ ते २७/१०/२०१६ दर. यातील फिर्यादी ही आरोपी क्र. १ ची पत्नी असुन त्यांनी राधाकृष्ण विवाह मंडळ नागपुर येथे लग्न केले आहे यातील आरोपीतांनी संगमत करून फिर्यादीस जगजाहीर लग्न करण्यासठी माहेरून १५,०००/—रू चा कोट, सोन्याचा गोफ, व कार घेण्यासाठी २,०००००/—रू पाहीजे म्हणुन फिर्यादीस शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने दि. २८/१०/२०१६ ला पो. स्टे. ला दिलेल्या लेखी रिपोर्ट व महीला सुरक्षा विषेश कक्ष यांचे अहवालावरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४९८(अ)३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक २३/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर, सिहोरा, साकोली, व तुमसर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी कि. २,२००/–रू. व ०३ लिटर ७०० मिली देशी दारू कि. ३,२५०/–रू तसेच जुगारातुन कि. २०५ /–रू असा एकुण कि. ३,४५५/ –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

25/11/2016

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९५५२५६५८५२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.